<u>वादीतर्फे सा.क्र.१</u>

<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>

<u>प्रतिवादीतर्फे उलटतपास विधिज्ञ श्री.पी.एल.गव्हाणे यांचे मार्फत</u> :–

०३. हे मला माहीत नाही की, बाळासाहेब कुडेकर यांची पत्नी आरोग्यसेविका असल्यामुळे ते प्रतापपूर येथे राहातात. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीचे आईवडील झोळे येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीचे सिमेंट कॉक्रिटीकरणचे बांधकाम केलेले घर झोळे येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, रे.मु.क्र.६५/१९९४ च्या दाव्यातील तडजोडीनुसार मला ग्रामपंचायत मिळकत क्र.४७६ (जुना क्र.६२) मिळाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत १अ च्या पुर्वेला ग्रामपंचायत झोळे यांची मोकळी जागा, पश्चिमेस ग्रामपंचायत मिळकत क्र.६१, उत्तरेला ग्रामपंचायत झोळे यांची मोकळी जागा व दक्षिणेला ग्रामपंचायत मिळकत क्र.१२१ अशा चतु:सिमा आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला दावा मिळकत १ब मधील घराव्यतिरिक्त दुसरे कोणतेही घर नाही.

०४. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने घराच्या दक्षिण बाजूस संडास बाथरूम बांधले होते ते मी दि.१५.०४.२०२१ रोजी पाडून टाकले. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीचे संडास बाथरुम पाडले त्यामुळे दि.१६.०४.२०२१ रोजी माझ्याविरुध्द तालुका पोलीस ठाणे येथे प्रतिवादीने तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.०२.२०२२ रोजी प्रतिवादीने संडास बाथरुम पाडल्यामुळे ग्रामपंचायत झोळे व गट विकास अधिकारी संगमनेर यांच्याकडे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने सदर तक्रारी दाखल केल्यामुळे मी खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने तंटा मुक्ती समितीकडे तक्रार केली होती म्हणून ते दि.१३.०८.२०२३ रोजी स्थळनिरीक्षण करण्याकरिता

घटनास्थळावर आले होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत १ब माझी वडिलोपार्जित असल्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांना मिळालेली ग्रामपंचायत मिळकत याबाबत मी कोठेही तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने सन १९९१ साली ग्रामपंचायत झोळे येथे ग्रामसेवक, सरपंच व इतर अधिकाऱ्यांना हाताशी धरून बोगस नोंद केली याबाबत कोठेही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या जागेची प्रतिवादीने अतिक्रमण केल्याबाबत शासकीय मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी यांच्या कुटुंबियांबद्दल मनात राग आहे.

०५. हे मला सांगता येणार नाही की, दाव्यातील दावा कलम १ मिळकत क्र.४८० व प्रतिवादीच्या प्रतिदाव्यातील मिळकत क्र.८४० या दोन्ही मिळकती वेगवेगळ्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीची जागा मला घ्यायची होती म्हणून मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी बाहेरगावी राहत असल्याने त्याच्या आईवडिलांना सतत त्रास देतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत १अ सन १९९१ पासून प्रतिवादीच्या ताब्यात असून त्याची ग्रामपंचायत झोळे येथे नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहिता, वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर खोटा असून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत,

( जी. आर. तौर )

दि. १३/०८/२०२५.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
संगमनेर.